


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३६४ वा बुधवार दि १३ मे २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# प्रफुल पटेल- सुनिल तटकरे भाजपमधून लढणार, २२ आमदारांचंही ठरलंय, रोहित पवारांचा सनसनाटी दावा...

**वृत्तसंस्था/ पुणे**

२२ आमदार घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिग्गज नेते सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल हे भारतीय जनता पक्षातून लढणार, असा सनसनाटी दावा राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांनी केला आहे. भाजपप्रवेश कधी करायचा, हे ठरणं बाकी असल्याचं रोहित पवार म्हणाले. ते पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते. राष्ट्रवादीत पक्षांतर्गत वाद सुरु असतानाच, सुनेत्रा पवारांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात पटेल-तटकरेंची पदं वगळल्याची कारकुनी चूक काल समोर आली होती. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी रोहित पवारांनी केलेल्या दाव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. त्यांचं ठरलेलं आहे ऑलरेडी. २२ आमदारांचं ठरलं आहे. एकनाथ शिंदे यांच्याही काही आमदारांचं ठरलं आहे. ज्या गोष्टी ठरल्या आहेत, त्याबद्दल मोघम बोलून चालत नाही. जे आहे ते आहे. भाजपमधून ते लढणार आहेत. फक्त प्रक्रिया फास्ट झाली. २०२९ च्या निवडणुकांपूर्वी होणं अपेक्षित होतं. कारण आताच प्रवेश झाला, तर पुन्हा निवडणूक लागेल.ङ्खङ्ख असं रोहित पवार म्हणाले. भाजपसोबत जे आहेत, त्यांच्याबरोबर आम्ही जाणार नाही, पण भाजपची साथ सोडून कोणी आमच्याकडे आलं, तर त्यांना स्वीकारु, असंही रोहित पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अंतर्गत लाथाळ्या थांबण्याची चिन्हे नाहीत. प्रफुल्ल पटेल यांना पदच्युत केल्याचे सोमवारी सायंकाळी उघड झाल्याने एकच खळबळ उडाली होती. त्यातच मध्यरात्री पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात कारकुनी चूक झाल्याचे स्पष्ट केले. परंतु राष्ट्रीय कार्यरकारिणीत पटेल यांना कायम ठेवले असले, तरी त्यांना पद न देणे; तसेच सुनील तटकरे यांच्याही नावासमोर राष्ट्रीय सरचिटणीस किंवा प्रदेशाध्यक्ष असे न लिहिल्याने कमालीचा गोंधळ निर्माण झाला आहे. यावरून नेत्यांमध्येही कमालीची नाराजी निर्माण झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी फेब्रुवारी २०२६ मध्ये नियुक्ती करण्यात आली. मात्र, काही दिवसांतच सुनेत्रा पवार यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला या निवडीविषयी माहिती देताना अजित पवार यांच्या निधनापासून अध्यक्षपदाच्या निवडणुकीपर्यंत झालेला सर्व पत्रव्यवहार रद्द समजावा असे कळवले होते. त्याच पत्रात पदाधिकाऱ्यांच्या यादीत प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांना मात्र वगळण्यात आले होते. सुनेत्रा पवार यांनी २९ एप्रिलला पुन्हा पत्र पाठवून पटेल आणि तटकरे यांच्या पदांच्या रकान्यात काहीच पद दिलेले नाही. ही बाब सोमवारी सायंकाळी उघड झाल्यावर पक्षात पुन्हा एकदा खळबळ उडाली. पटेल यांना राष्ट्रीय पदाधिकारी म्हणून स्थान देण्यात आलेले नसले, तरी राष्ट्रीय कार्यकारिणीत त्यांचा समावेश करण्यात आलेला आहे; तसेच तटकरे यांनाही प्रदेशाध्यक्ष किंवा राष्ट्रीय सरचिटणीस या पदाची नोंद न



करण्यात आल्याने त्यांच्या भवितव्याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. अखेर मंगळवारी मध्यरात्री १.०५ वाजता सुनेत्रा पवार यांनी पदाधिकाऱ्यांची यादीत चूक झाली असून, ती लवकरच सुधारण्यात येईल, असे ङ्गएक्सफ्न्न्र पोस्ट केले. मंगळवारी सुनेत्रा पवार या आसाममध्ये नवनिर्वाचित मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांच्या शपथविधीसाठी हजर होत्या, तर प्रफुल्ल पटेल हे त्यांच्याच सोबत होते. यामुळे पक्षातील आमदार आणि नेत्यांमध्ये कमालीची नाराजी पसरली असून, यामुळे पक्षातील ज्येष्ठांना डावलण्यात येत असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. पक्षात पार्थ पवार आणि पटेल-तटकरे यांच्यात संघर्ष वाढत असल्याची धारणा वाढत असून, पवार कुटुंबाकडून पक्षावर वर्चस्व गाजवायचा प्रयत्न होत असल्याचा आक्षेप घेतला जात आहे.

# भाजपचा मित्रपक्ष फुटीच्या उंबरठ्यावर; वाढदिवशीच नेतृत्त्वाचा गेम, 30 आमदार वेगळ्या विचारात

**वृत्तसंस्था/ चेन्नई**

तमिळनाडूच्या विधानसभेत उद्या बहुमत चाचणी होणार आहे. मुख्यमंत्री जोसेफ विजय यांना विधानसभेत सरकारचं बहुमत सिद्ध करावं लागेल. त्याआधी राज्याच्या राजकारणात घडामोडींना वेग आला आहे. मुख्यमंत्री आणि टीव्हीकेचे प्रमुख विजय यांनी मंगळवारी अण्णाद्रमुकचे बंडखोर नेते एस. पी. वेलुमणी आणि सी. व्ही. षणमुगम यांची भेट घेतली. ही भेट अतिशय महत्त्वाची मानली जात आहे. वेलुमणी-षणमुगम गटाकडे अण्णाद्रमुकच्या ४७ पैकी जवळपास ३० आमदारांचा पाठिंबा आहे. हे आमदार बहुमत चाचणीत सरकारच्या बाजूनं मतदान करण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी अण्णाद्रमुकच्या कार्यालयात जाऊन षणमुगम, वेलुमणी आणि अन्य नेत्यांची भेट घेतली. या नेत्यांनी विजय यांचं पुष्पगुच्छ देभन त्यांचं स्वागत केलं. यावेळी अण्णाद्रमुकचे अनेक नेते विजय यांच्याशी संवाद साधताना दिसले. विजय यांनीही वेलुमणी, षणमुगम आणि अण्णाद्रमुकच्या अन्य सदस्यांशी बराच वेळ चर्चा केली. काही दिवसांपूर्वी राज्यात सत्ता पेच निर्माण झाला होता. तेव्हा षणमुगम आणि वेलुमणी यांनी विजय यांना पाठिंबा देण्याची भूमिका जाहीरपणे घेतली होती. विजय यांच्या टीव्हीके पक्षानं नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत २३४ पैकी १०८ जागा जिंकल्या. त्यांचा पक्ष राज्यात क्रमांक एकचा पक्ष ठरला. पण त्यांना बहुमतासाठी १० जागा कमी पडल्या. त्यामुळे त्यांना काँग्रेससह लहान पक्षांचा पाठिंबा घ्यावा लागला. या दरम्यान अण्णाद्रमुकचे नेते षणमुगम आणि वेलुमणी यांनी त्यांच्या पक्षाचे ३० आमदार टीव्हीकेला पाठिंबा देण्यास तयार असल्याचं म्हटलं होतं. पण अण्णाद्रमुकचे महासचिव एडप्पादी के. पलानीस्वामी यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली नाही. त्यामुळे पक्षात अंतर्गत कलह वाढला. भारतीय जनता पक्षाचा मित्रपक्ष असलेला, तमिळनाडूत त्यांच्या सोबत विधानसभा निवडणूक लढवलेला अण्णाद्रमुक पक्ष सध्या फुटीच्या उंबरठ्यावर आहे. पक्षात पलानीस्वामी यांचा एक गट आहे. तर दुसऱ्या गटात वेलुमणी-षणमुगम यांच्यासह अन्य नेते, आमदार आहेत. २०१९, २०२१, २०२४ आणि २०२६ च्या निवडणुकांमध्ये अण्णाद्रमुकचा पराभव झाल्यानं बरेच नेते पलानीस्वामी यांच्या नेतृत्त्वावर नाराज



आहेत. आता त्यांची नाराजी उघडपणे समोर येऊ लागली आहे. योगायोगाचा भाग म्हणजे, अण्णाद्रमुकचे सर्वेसर्वा पलानीस्वामी यांचा आज वाढदिवस आहे. त्यांच्या जन्मदिनीच त्यांचे जीवलग मित्र सी. व्ही. शनमुगम यांनी पक्षाचे दोन तुकडे केले आहेत. विधानसभेतील बहुमत चाचणी २४ तासांवर आलेली असताना शनमुगम यांनी सरकारला पाठिंबा देण्याची घोषणा केलेली आहे. आपल्या गटात ३० आमदार असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

# जलसंकटाला भिडताना...

यंदाचा उन्हाळा तापमानाचे वेगवेगळे विक्रम मोडणारा आहे. त्यामुळे पाणीसाठ्यांवर गंभीर परिणामही दिसत आहेत. मुंबई शहरात १० टक्के पाणीकपात जाहीर केली आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला राज्यातील एकूण उपयुक्त पाणीसाठा सुमारे ३७ टक्क्यांवर आला असून जवळपास ६२ टक्के साठा रिकामा आहे. बहुतांश भागात तापमान ४० ते ४५ अंश सेल्सिअस दरम्यान असल्यामुळे पाण्याचा वापर सरासरी १५ ते टक्क्याने वाढलेला आहे. याचवेळी धरणांमधील बाष्पीभवनाचे प्रमाणही वाढून दररोज सुमारे ०.३ ते ०.५ टक्के साठा कमी होताना दिसतो. उपलब्ध पाणी केवळ वापरामुळे नव्हे, तर नैसर्गिकरीत्या देखील झपाट्याने घटत आहे. विभागनिहाय पाहता विदर्भातील काही भागांत तुलनेने साठा समाधानकारक असला तरी पुणे विभागात तो ३० टक्क्यांच्या खाली गेल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे, तर मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातही मध्यम ते उच्च जोखीम निर्माण झाली आहे.

राज्यातील सहा महसुली विभाग, सुमारे ४४ हजार गावे तसेच नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रांतील कोट्यवधी लोकसंख्या ही मोसमी पावसावरच अवलंबून आहे. महाराष्ट्रातील प्रमुख जलाशयांवर राज्यातील मोठी लोकसंख्या अवलंबून आहे. मुंबई महानगर प्रदेशातील सुमारे २.३० कोटी लोकसंख्या, तसेच पुणे, नाशिक, नागपूर, संभाजीनगर यांसारखी शहरे आणि हजारो गावे जलाशयांवर पिण्याच्या पाण्यासाठी अवलंबून आहेत. एकूण सुमारे सात कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या जलाशयांवर थेट किंवा अप्रत्यक्षपणे अवलंबून आहे.

राज्यात सुमारे २.२५ कोटी हेक्टर क्षेत्र शेतीखाली असून त्यातील मोठा भाग अजूनही पावसावर अवलंबून आहे. सिंचनाखालील क्षेत्र मर्यादित असल्याने पावसातील खंडाचा थेट परिणाम उत्पादनावर होतो. मृग नक्षत्रात पाऊस झाला नाही, तर दुबार पेरणीचे संकट उभे राहू शकते. त्यामुळे जलाशयांतील पाणीपातळी कमी झाली की त्याचा परिणाम सर्वच क्षेत्रांवर होतो. राज्यातील सिंचन व्यवस्थेचे स्वरूप पाहता भूजलावर असलेले प्रचंड अवलंबित्व स्पष्ट होते. लघुसिंचन पाहणी (२०१३-१४) नुसार महाराष्ट्रात विहिरी आणि ट्युबवेल असे एकूण २६ लाख भूजल स्रोत आहेत. पावसातील अनिश्चितता वाढली की भूजलसाठ्यावर ताण वाढतो आणि जलपातळी झपाट्याने खाली जाते. विशेषतः मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील भागात खोल कूपनलिकांची (सुमारे ५०० फुटांपेक्षाही अधिक) संख्या वाढत असल्याने जलस्रोतांची दीर्घकालीन शाश्वतता धोक्यात येत आहे. जलशक्ती मंत्रालयाने २०२२ साली पहिली जलस्रोत गणना केली. त्यानुसार एकूण ९७,०६२ जलस्रोत असून ९६,३४३ जलस्रोत ग्रामीण भागात आहेत. त्यापैकी ५१,९५९ शासकीय मालकीचे आहेत तर ४१,३५१ हे पंचयातींच्या अखत्यारीत येतात.

भूजलावर राज्याचा मोठा भार आहे. सुमारे २६ लाखांहून अधिक विहिरी आणि कूपनलिका कार्यरत असून तोच शेती आणि पिण्याच्या पाण्याचा मोठा स्रोत आहे. भूजलाचा अधिक उपसा होत असल्याने, अनेक भागांत भूजल पातळी सातत्याने खाली जात आहे. घटती भूजल पातळी आणि तलावांतील झपाट्याने कमी होत असलेला जलसाठा या चिंतेच्या बाबी



आहेत. दुसरीकडे, राज्यातील ५४ नदीपट्टे प्रदूषित असल्यामुळे उपलब्ध पाणीही वापरण्यास अयोग्य ठरत आहे. त्यामुळे पाण्याची कमतरता आणि पाण्याची गुणवत्ता या दोन्ही समस्या गंभीर बनल्या आहेत. जे जुने जलाशय आहेत अथवा लघुसिंचन/कोल्हापूर पद्धतीचे बंधारे/ तलाव आहेत, त्यांची मोठ्या प्रमाणावर तूटफूट झाली असून या परिस्थितीमुळे जलाशयांतील साठा टिकून राहत नाही आणि भूजल पुनर्भरण कमी होते. उन्हाळ्याच्या अखेरीस अनेक धरणांतील पाणीपातळी २० ते ३० टक्क्यांपर्यंत खाली येते, विशेषतः मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात ही स्थिती अधिक गंभीर असते.






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# 'नीट' परीक्षेत सरकार नापास; पेपरफुटीच्या संशयामुळे परीक्षाच रद्द करण्याची नामुष्की

**नागपूर/वृत्तसंस्था**

पेपरफुटीच्या संशयावरून वैद्यकीय पदवी प्रवेशासाठी घेतली जाणारी संपूर्ण नीट-यूजी परीक्षाच रद्द करण्याची नामुष्की केंद्र सरकारवर मंगळवारी ओढवली. यातील अनियमिततेची चौकशी केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) करणार आहे. परीक्षा रद्द करण्याच्या निर्णयाबद्दल लाखो विद्यार्थ्यांमध्ये रोष असून, विरोधकांनीही सरकारवर टीकेची झोड उठवली. तीन मे रोजी ही परीक्षा झाली होती. २०२४ मध्येच परीक्षेत गैरप्रकार झाल्याचे उघडकीस आल्यानंतरही राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) यापासून कुठलाही धडा घेतल्याचे घेतला नसल्याचे यावरून स्पष्ट होत आहे.

'नीट २०२६' पेपरफुटीच्या प्रकरणात नाशिक पोलिसांनी मंगळवारी इंदिरानगर भागातून शुभम खैरनार या २७ वर्षाच्या विद्याथ्र्याला ताब्यात घेतले. त्याला टपालाने (कुरिअर) नीटची प्रश्नपत्रिका मिळाली. शुभमने




१० लाख रुपयांना खरेदी केलेली प्रश्नपत्रिका नंतर त्याने १५ लाख रुपयांना विकल्याचा संशय आहे. संशयित शुभमने वेशभूषा बदलली होती. त्यामुळे त्याची माहिती मिळत नव्हती. गुन्हे शाखेच्या युनिट दोनने तांत्रिक कौशल्याने त्याचा तपास लावला.

तपास यंत्रणांनी सादर केलेल्या अहवालात परीक्षेच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते, असे 'एनटीए'ने स्पष्ट केले. 'व्यवस्थे'मधील विश्वासार्हता जपण्यासाठी आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी ही परीक्षा रद्द करून पुन्हा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. 'एनटीए'कडून होणाऱ्या 'नीट' परीक्षेत दरवर्षी गोंधळ होत असल्याने परीक्षेच्या पारदर्शकतेवरच प्रश्न उपस्थित केले जात आहेत. २०२४ मध्ये ६७ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले. इतिहासात असे पहिल्यांदाच घडले. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले आणि काही विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेण्याची वेळ 'एनटीए'वर आली होती. मात्र, यानंतरही यंत्रणेने कुठल्याही नवीन सुधारणा केल्या नाहीत. नीट २०२६ परीक्षेसाठी यंदा सुमारे २२ लाख ७९ हजार ७४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. 'एनटीए'च्या चुकांमुळे आता या सर्वांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे.

'एनटीए'ने १० मे रोजी जारी केलेल्या निवेदनानुसार, नीट (यूजी) २०२६ परीक्षेच्या संदर्भात कथित अनियमिततांबाबत राजस्थानच्या विशेष तपास यंत्रणेने कारवाई सुरू केल्याची माहिती दिली होती. तसेच कारवाईविषयी 'एनटीए'ला पूर्ण कल्पना असल्याचेही नमूद केले होते. परीक्षा झाल्यानंतर ७ मे रोजी रात्री परीक्षेच्या संदर्भात कथित गैरप्रकारांविषयी काही माहिती मिळाली. या माहितीची स्वतंत्र पडताळणी करण्यासाठी आणि आवश्यक ती कारवाई करण्यासाठी ८ मे रोजी ही माहिती केंद्रीय तपास यंत्रणेकडे सोपवली होती. ३२० पैकी १२० प्रश्न फुटले होते, अशीही माहिती आहे.

नॅशनल टेस्टिंग एजन्सीचे (एनटीए) महासंचालक अभिषेक सिंह यांनी या पेपरफुटीप्रकरणी दिलेले स्पष्टीकरण संदिग्ध होते. ते म्हणाले की तीन मे रोजी झालेल्या परीक्षेसाठी चार नमुना प्रश्नसंच होते. यांपैकी कोणताही संच बाहेर आढळलेला नाही त्यामुळे पेपरफुटी झाली, असे थेट म्हणता येत नाही. पण जी पीडीएफ अग्रेषित झाली, त्यांतील काही प्रश्नांचे मूळ प्रश्नसंचातील प्रश्नांशी साधर्म्य आढळले. हा प्रकार आमच्या 'शून्य सहनशीलता, शून्य त्रुटी' (झिरो टॉलरन्स, झिरो एरर) धोरणाशी विसंगत असल्यामुळेच फेरपरीक्षा घेण्याचा काहीसा कष्टप्रद निर्णय आम्हाला घ्यावा लागला.

## ज्योतिषाची सरकारी पदावर वर्णी; मुख्यमंत्री विजय यांना मित्रपक्षांचा घरचा आहेर

**नागपूर/वृत्तसंस्था**

तमिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी आपल्या वैयक्तिक ज्योतिषाची मुख्यमंत्री कार्यालयात 'विशेष कार्य अधिकारी' (OSD) म्हणून नियुक्ती केल्याने नवा राजकीय वाद उफाळून आला आहे. मुख्यमंत्र्यांचे ज्योतिषी राधन पंडित वेट्रिवेल यांची या महत्त्वाच्या पदावर वर्णी लावल्याने मित्रपक्ष असलेल्या व्हीसीकेसह, डीएमडीके आणि एमजेके या पक्षांनी जोरदार टीका केली आहे.


तमिळनाडू विधानसभेत सध्या 'तमिळगा वेत्री कळघम' (TVK) सरकारच्या विश्वासदर्शक ठरावाची प्रक्रिया सुरू आहे. याच काळात मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या या निर्णयावर विरोधी आणि मित्रपक्षांनी निशाणा साधला. विशेष म्हणजे, ज्या ज्योतिषाने विजय यांच्या पक्षाच्या विजयाची भविष्यवाणी केली होती, त्यांनाच आता थेट सरकारी अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. यामुळे प्रशासनात ज्योतिषशास्त्राचा वाढता हस्तक्षेप चर्चेचा विषय ठरला आहे. मुख्यमंत्री विजय यांना पाठिंबा देणाऱ्या VCK (विदुथलाई चिरुथाईगल काची) या पक्षाने या नियुक्तीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "सरकारने ज्योतिषापेक्षा विज्ञानावर अधिक विश्वास ठेवला पाहिजे. प्रशासनात वैज्ञानिक विचारसरणीला प्राधान्य देणे आवश्यक आहे," असे मत VCK च्या ज्येष्ठ नेत्यांनी व्यक्त केले. अशा नियुक्त्यांमुळे जनतेमध्ये आणि तरुण पिढीमध्ये चुकीचा संदेश जात असल्याची भीती राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे.

टीका करूनही, विश्वासदर्शक ठरावावेळी VCK ने विजय सरकारला पाठिंबा कायम ठेवला आहे, ही विशेष बाब ठरली आहे. विजयकांत यांच्या 'डीएमडीके' पक्षानेही या नियुक्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. संबंधित ज्योतिषाची नेमकी पात्रता काय आणि एका ज्योतिषाला सरकारी पदावर बसवून सरकार काय साध्य करू इच्छिते, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. हा मुद्दा केवळ राजकीय राहिला नसून आता न्यायालयीन कक्षेत पोहोचला आहे.

## "तुम्ही आज घर पाडाल, उद्या आम्ही आणखी अलिशान घर बांधू", घरावरील कारवाईवरून इम्तियाज जलील संतापले

**नागपूर/वृत्तसंस्था**

नाशिकच्या टीसीएस प्रकरणातील आरोपी नीदा खान छत्रपती संभाजीनगरमधील एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांच्या घरात लपली होती. याच घरावर महानगरपालिकेने आता बुलडोझर चालवला असून घर जमिनदोस्त करण्यात आलंय. सकाळी सहा वाजताच पालिकेने ही कारवाई केली. त्याआधीच एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी तेथील नागरिकांशी संवाद साधला आणि महानगरपालिकेच्या कारवाईत अडथळा आणू नका असं आवाहन केलं.



इम्तियाज जलील म्हणाले, "तुमच्या प्रेमामुळे मोठी ताकद निर्माण झाली आहे. मी नेहमी इथं आनंदाचं वातावरण असताना आलेलो आहे. पण आज मी अशा वेळेला आलोय जिथे सरकार एका बाजूला आणि आपण एका बाजूला आहोत. सोशल मिडिया आणि टीव्हीवर काय चाललंय ते आपण पाहिलंय. मला एक प्रश्न आहे की आमच्यासाठी कायदा वेगळा आणि इतरांसाठी वेगळा आहे का?" "आज भाजपाच्या निवडून आलेल्या नगरसेवकांच्या बेकायदेशीर बांधकामांचे इतके पुरावे आहेत. यामध्ये महानगर पालिकांच्या अतिक्रमण विभागाने लिहून दिलंय की हे अनधिकृत आहे, ते तोडलं पाहिजे, नगरसेवकांवर कारवाई केली पाहिजे. पण त्यावर कोणतीही कारवाई होत नाही", असंही जलील म्हणाले. "मतीन पटेलला निशाणा बनवलं जातंय, असं तुम्हाला वाटत असेल. पण वस्तुस्थिती ही आहे की मीच यांच्या निशाण्यावर आहे. कारण, आम्ही लढत आहोत, आम्ही बोलत आहोत, ज्यांच्यावर अन्याय अत्याचार होत आहे त्यांच्याबरोबर आम्ही आहोत. आपण जिथे जगत आहोत, तिथे एखाद्यावर आरोप केला की मिडिया त्यांना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी करतो", असा आरोपही जलील यांनी केला. ते पुढे म्हणाले, "नाशिक प्रकरणात एखादी व्यक्ती दोषी असेल तर मिडिया किंवा सरकार ठरवणार का शिक्षा द्यायची की नाही? मग पोलीस ठाणे बंद करा. याविरोधात कोणी बोलणारं नाही." इथे येण्याआधी मी वकिलांशी बोललो आहे. आम्ही बैठक बोलावली असून तन मन आणि धनाने मतीन पटेलबरोबर आहोत. या घराला काही किंमत नाहीय. असे ५०-६० घरे आपण बांधू शकतो. जर मतीनचं घर कोसळलं असेल तर मी तुम्हाला शब्द देऊन जातो की पूर्ण हिंदूस्तान पाहील की ज्या पद्धतीने हे घर पाडलं गेलं, त्या पेक्षा अलिशान घर आम्ही बांधू, हे आम्ही करून दाखवू", असंही आव्हान त्यांनी दिलं.

## मोदींचा मोठा निर्णय; ताफ्यातील वाहनांची संख्या निम्म्याने कमी करण्याचे SPG ला निर्देश

**सोलापूर/वृत्तसंस्था**

अमेरिका-इराणमधील युद्धामुळे पश्चिम आशियात अद्यापही तणाव आहे. या तणावाचा जगावर मोठा परिणाम होत असल्याचं दिसून येत आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीमधून होणाऱ्या कच्च्या तेलाच्या व्यापाराला अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे अनेक देशात इंधन पुरवठ्याची साखळी विस्कळीत होत असल्याचं पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवरच आता भारताने देखील अधिक सावध भूमिका घेत उपाययोजना राबवण्यास सुरूवात केली आहे.

या अनुषंगाने पंतप्रधान मोदी यांनी जनतेला इंधन बचत करण्याचं आवाहन केलं आहे. त्या पार्श्वभूमीवर आता पंतप्रधान मोदी यांनी या आवाहनाची सुरूवात स्वत:पासून करण्याचा निर्णय घेत त्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या निम्म्याने कमी करण्याचे निर्देश एसपीजीला (SPG) दिले आहेत अशी माहिती समोर आली आहे.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार त्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अधिकृतपणे कमी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पंतप्रधान मोदींनी त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणाऱ्या एसपीजीला आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या ५० टक्क्यांनी कमी करण्याचा प्रयत्न करण्यास सांगितलं आहे. याशिवाय अतिरिक्त खर्च टाळण्यासाठी नवीन वाहने न खरेदी करता, ताफ्यात इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्याच्या सूचना देखील त्यांनी दिल्या असल्याचं वृत्तात म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या सूचनांची एसपीजीने अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली आहे. दरम्यान, एका अधिकाऱ्याच्या माहितीनुसार, "इंधनाचा वापर कमी करण्यासाठी सर्व उपाययोजना राबवण्यासाठी चर्चा सुरू आहे. पंतप्रधानांचा संदेश आमच्यासह सर्वांसाठी आहे. आम्ही काय करावं? याबद्दल विभागाकडून माहितीची आम्ही वाट पाहत आहोत. मात्र, प्रत्येक विभागाला स्वतःच्या उपाययोजना आखाव्या लागतील." जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना इंधनाची बचत करण्याचं आवाहन केलं होतं. इंधनाची बचत करणं आणि पेट्रोल व डिझेल खरेदीवर खर्च होणारे परकीय चलन वाचवणं ही आपली जबाबदारी असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं होतं. पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं होतं की, "आपण पेट्रोल, गॅस आणि डिझेलचा वापर कमी केला पाहिजे. शेजारील देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे जगभरात पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती अनेक पटींनी वाढल्या आहेत. आपल्याकडे मोठ्या तेल विहिरी नसल्यामुळे या जागतिक संकटाचा भारतावर अधिक परिणाम होत आहे. त्यामुळे ज्या शहरांमध्ये मेट्रो आहेत, तिथे लोकांनी मेट्रोचा वापर केला पाहिजे. आज आपल्याला बैठकांसाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग आणि वर्क फ्रॉम होम या सारख्या उपाययोजनांची गरज आहे."

सन १९८५ पासून विशेष सुरक्षा दल (एसपीजी) पंतप्रधान आणि त्यांच्या कुटुंबातील जवळच्या व्यक्तींच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळत आहे. यामध्ये स्वत: पंतप्रधान, त्यांची मुले आणि त्यांच्या पालकांचा समावेश असतो. याशिवाय 'एसपीजी'कडून माजी पंतप्रधान आणि त्यांच्या कुटुंबियांना देखील सुरक्षा पुरविण्यात येते. एसपीजीची सुत्रे महानिरीक्षक (आयजी) पदावरील अधिकाऱ्याकडे असतात. या पदावरील व्यक्तीचा कार्यकाळ तीन वर्षांचा असतो. एसपीजी केंद्रीय सचिवांच्या अधिकार कक्षेत येत असून सुरक्षा सचिव एसपीजीचे नेतृत्व करतात.

# धक्कादायक कौटुंबिक वादातून सुनेकडून सासूचा खून; भारती विद्यापीठ परिसरातील घटना

■ पुणे/वृत्तसंस्था

कौटुंबिक वादातून सुनेने ८० वर्षीय सासूवर स्वयंपाकघरातील सुरीने वार करुन खून केल्याची धक्कादायक घटना भारती विद्यापीठ परिसरात घडली. या प्रकरणी सुनेला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. सुमन अण्णासाहेब शिंदे (वय ८२, रा. समृद्धी रेसीडन्सी, आंबेगाव बुद्रुक, भारती विद्यापीठ परिसर) असे खून झालेल्या ज्येष्ठ महिलेचे नाव आहे. या प्रकरणी अनुपमा संजय शिंदे (वय ६०) यांना अटक करण्यात आली. याबाबत पोलीस शिपाई मल्लिकार्जुन कोळी यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अनुपमा शिंदे, त्यांचे पती संजय, विवाहित मुलगा, सून आणि सासू सुमन हे एकत्र राहायला आहेत. अनुपमा यांचे पती सेवानिवृत्त आहेत. विवाहित मुलगा नोकरी करतो. अनुपमा यांचा किरकोळ कारणावरुन सासूबरोबर वाद



व्हायचा.

मंगळवारी (१२ मे) अनुपमा आणि सुमन घरात होत्या. दुपारी दीडच्या सुमारास त्यांच्यात वाद झाला. वादातून अनुपमा यांनी सुमन यांच्यावर स्वयंपाकघरातील सुरीने सासू सुमन यांच्यावर वार केले. त्यानंतर त्यांनी स्वत:ला कोंडून घेतले. अनुपमा यांनी कोंडून घेतल्याची माहिती कुटुंबीयांना मिळाली. त्यानंतर त्यांनी पोलीस नियंत्रण कक्षाला याबाबतची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन दरवाजा उघडला. पोलिसांनी घराची पाहणी केली. शयनगृहात सुमन रक्ताच्या थारोळ्यात पडल्या होत्या. पोलिसांनी चौकशी केली. तेव्हा कौटुंबिक वादातून सुनेने सासूचा खून केल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सुमन यांना ससून रुग्णालयात दाखल केले. अनुपमा यांची चौकशी करण्यात आली. तेव्हा त्यांनी खून केल्याची कबुली दिली. या प्रकरणी त्यांना अटक करण्यात आली. पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते, सहायक आयुक्त राहुल आवारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुलकुमार खिलारे यांनी घटनास्थळी भेट दिली. सहायक पोलीस निरीक्षक मिथुन परदेशी तपास करत आहेत.

प्रेमविवाह केल्याने तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आल्याची घटना ढोले-पाटील रस्ता परिसरात घडली. या प्रकरणी तरुणाच्या मेहुण्यासह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.किरण धनराज खरात (वय ३१, रा. ताडीवाला रस्ता, पुणे स्टेशनजवळ) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी साहिल गौतम जगताप आणि रोहन निगडे (वय ३१, दोघे रा. ताडीवाला रस्ता, पुणे स्टेशनजवळ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत खरात याने कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, किरण खरात हा डिलिव्हरी बॉय म्हणून काम करतो. दोन वर्षांपूर्वी त्याने एका आरोपीच्या बहिणीशी प्रेमविवाह केला होता. खरात आणि तरुणीच्या प्रेमविवाहास कुटुंबीयांनी विरोध केला होता. खरात आणि आरोपीच्या कुटुंबीयांमध्ये वादही झाले होते. खरात याची पत्नी नुकतीच प्रसूत झाली होती.

शनिवारी (९ मे) रात्री साडेदहाच्या सुमारास खरात ढोले-पाटील रस्त्यावर थांबला होता. त्या वेळी आरोपी तेथे आले. त्यांनी खरातला शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तसेच त्याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. गंभीर जखमी झालेल्या खरातला तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत असून, हवालदार भागवत या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या इंधन बचतीच्या आवाहनावर अंजली दमानियांचा बोचरा प्रश्न


■ पुणे/वृत्तसंस्था

स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात वेगवेगळ्या घटनांत प्रवासी महिलांच्या गळ्यातील एक लाख ६९ हजार रुपयांचे दागिने चोरट्यांनी लांबविल्याची घटना घडली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात रविवारी (१० मे) सकाळी साडेआठच्या सुमारास प्रवासी महिलेच्या गळ्यातील एक लाख ४ हजार रुपयांचे दागिने चोरट्यांनी लांबविले. याबाबत एका महिलेने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ३५ वर्षीय महिला धनकवडीतील आंबेगाव पठार भागात राहायला आहेत. त्या उन्हाळी सुट्टी असल्याने मुलांसोबत माहेरी निघाल्या होत्या. गर्दीत चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील दागिने लांबविले. स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात सोमवारी (११ मे) एका महिलेच्या गळ्यातील ६५ हजार रुपयांचे मंगळसूत्र चोरट्यांनी लांबविल्याची घटना घडली. याबाबत एका ५४ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला पिंपरी-चिंचवड परिसरातील चऱ्होली भागात राहायला आहेत. त्या गावी निघाल्या होत्या. गर्दीत चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबविले. पोलीस उपनिरीक्षक कोतकर तपास करत आहेत. स्वारगेट एसटी स्थानक परिसरात एका ज्येष्ठ नागरिकाच्या गळ्यातील सोनसाखळी लांबविण्याची घटना नुकतीच घडली होती. उन्हाळी सुट्टीत अनेकजण परगावी जातात. स्वारगेट, मुंबई-पुणे रस्त्यावरील वाकडेवाडी, तसेच पुणे स्टेशन परिसरातील एसटी स्थानकात प्रवाशांची गर्दी असते. दरवर्षी उन्हाळी सुट्टीत एसटी स्थानकाच्या आवारात महिलांचे दागिने चोरून नेण्याच्या घटना वाढतात.

## चांदूर रेल्वेत १ कोटींचा अवैध गुटखा जप्त

■ अमरावती/वृत्तसंस्था




राज्यात बंदी असलेला पण परराज्यात उत्पादित होणारा गुटखा, सुगंधी तंबाखू आदी पदार्थ पोलीस पकडतात. तरीही शहरासह जिल्ह्यातील पान टपऱ्यांवर हाच गुटखा सहजतेने उपलब्ध होतो, असेच चित्र गेल्या अनेक वर्षांपासून दिसत आहे. अमरावती ग्रामीण पोलीस दलाने अवैध गुटखा तस्करीविरुद्ध मोठी कारवाई करत चांदूर रेल्वे परिसरात तब्बल १ कोटी १ लाख ३५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत १० टन सुगंधी तंबाखू आणि गुटख्यासह एक मालवाहू ट्रक आणि मोबाईल जप्त करण्यात आले असून, आंतरराज्यीय तस्करीचे धागेदोरे शोधले जात आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांना आज पहाटेच्या सुमारास एका ट्रकमधून अवैध गुटख्याचा मोठा साठा वाहून नेला जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे चांदूर रेल्वे पोलिसांच्या पथकाने तातडीने मालखेड परिसरात नाकेबंदी करून पाठलाग केला. संशयास्पद वाटणारा ट्रक (क्रमांक एमएच ०१/सीव्ही ४९६२) पोलिसांनी मोठ्या शिताफीने अडवला. पोलिसांनी ट्रकची झडती घेतली असता, त्यात १० टन अवैध गुटखा आणि सुगंधी तंबाखूचा साठा आढळून आला. यात अंदाजे ७५.७५ लाख रुपये किमतीचा गुटखा आणि तंबाखू, २५ लाख रुपये किमतीचा मालवाहू ट्रक, ६० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन संच, असा एकूण १.०१ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत ट्रक चालक शेख इमरान शेख सुस्कान (वय ३६, रा. पठाण चौक, अमरावती) याला पोलिसांनी पकडून ताब्यात घेतले आहे. मात्र गुन्ह्यातील आणखी ३ ते ४ आरोपी फरार असून पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत. या सर्वांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहेत. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार आणि पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक विना पंडे, रोहित कुदळे, नितेश आझाडे यांच्यासह अन्य पोलीस अंमलदारांचा समावेश होता.

## प्रेमसंबंधाच्या संशयावरून तरुणावर हल्ला, अपघातग्रस्ताला मदत केल्याने मारहाण

■ पिंपरी/वृत्तसंस्था

तळेगाव दाभाडे येथे घरात कोणी नसल्याची संधी साधून चुलत भावाने कपाटातील दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना सोमवारी (११ मे), सकाळी ६.०० ते दुपारी २.०० वाजण्याच्या दरम्यान मनोहरनगर, तळेगाव दाभाडे येथे घडली.

याप्रकरणी ३७ वर्षीय व्यक्तीने तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी कर्नाटक राज्यातील भावा विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांची पत्नी कामावर गेले असताना त्यांचा चुलत भाऊ घरी आला होता. त्याने घरातील बेडरुममध्ये असलेल्या उघड्या लोखंडी कपाटाच्या लॉकरमधून एक लाख २९ हजार ५०० रुपये किमतीचे सोने-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम फिर्यादीच्या संमतीशिवाय चोरून नेली. तळेगाव दाभाडे पोलीस तपास करत आहेत. बहिणीशी प्रेमसंबंध असल्याच्या




संशयावरून भोसरी येथे एका तरुणाला चौघांनी मिळून बेदम मारहाण केली. ही घटना रविवारी (१० मे) रात्री पावणे बाराच्या सुमारास भोसरी येथे घडली. याप्रकरणी २२ वर्षीय तरुणाने भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चौघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हा घरासमोर बसलेला असताना आरोपी तिथे आले. एका आरोपीच्या बहिणीशी फिर्यादीचे प्रेमसंबंध असल्याचा संशय आरोपींना होता. या रागातून त्यांनी फिर्यादीला शिवीगाळ करित लाथा-बुक्क्यांनी, दांडक्याने आणि तेथे पडलेल्या दगडाने मारहाण करून जखमी केले. भोसरी पोलीस तपास करत आहेत.

अपघातातील जखमीला मदत करण्यास गेलेल्या तरुणाला मारहाण

म्हाळुंगे येथे अपघातात जखमी झालेल्या महिलेला रुग्णालयात दाखल करून परतलेल्या तरुणाला आणि त्याच्या भावाला दगड आणि काठीने बेदम मारहाण केली. ही घटना सोमवारी (११ मे) सकाळी साडेदहाच्या सुमारास घडली. याबाबत ३६ वर्षीय तरुणाने म्हाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांनी अपघातात जखमी झालेल्या महिलेला गुन्हा दाखल झालेल्या एका आरोपीच्या मदतीने रुग्णालयात नेले होते. त्यानंतर पुन्हा घटनास्थळी आल्यावर आरोपीने विनाकारण शिवीगाळ सुरू केली. फिर्यादी जीव वाचवण्यासाठी कंपनीत पळाले असता, आरोपींनी तिथे जाऊन त्यांना ओढत बाहेर काढले. आरोपीने दगडाने फिर्यादीच्या डोळ्याखाली मारले, तर त्याच्या एका साथीदाराने लाकडी काठीने पायावर मारून जखमी केले. म्हाळुंगे पोलीस तपास करत आहेत.

वाईन शॉपमधून मद्याचे पार्सल घेऊन बाहेर येत असताना रस्ता मागितल्याच्या कारणावरून एका तरुणावर आणि त्याच्या मित्रावर स्क्रू-ड्रायव्हरने हल्ला करण्यात आला. ही घटना रविवारी (१० मे) रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास माण येथे घडली.

याबाबत ३८ वर्षीय तरुणाने हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी चौघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांचा मित्र वाईन शॉपबाहेर येत असताना वाटेत आरोपी उभे होते. फिर्यादीने "मला बाहेर जायचे आहे, जागा द्या" असे म्हटल्याचा आरोपींना राग आला. यावरून त्यांनी शिवीगाळ करत लाथा-बुक्क्यांनी मारहाण सुरू केली. त्यानंतर टेस्टर्स स्क्रू-ड्रायव्हरने फिर्यादीच्या डोक्यात आणि तोंडावर मारून जखमी केले, तसेच मित्राच्या डोक्यातही वार केला. हिंजवडी पोलीस तपास करत आहेत.


# "प्रभसिमरनचं वजन वाढलं, खेळाडू सुस्तावले", पंजाब संघासंबंधित अफवांवर प्रिती संतापली

■ मुंबई, वृत्तसंस्था :

पंजाब किंग्सने आपल्या आयपीएल २०२६ मोहिमेची सुरुवात दणक्यात केली होते. सलग सहा सामने जिंकल्यानंतर आता प्लेऑफच्या तोंडावर आल्यानंतर संघाने ४ सामने गमावली आहेत. संघाच्या पराभवाच्या मालिकेदरम्यान समोर आलेल्या काही बातम्यांमुळे आता पंजाब किंग्सचे व्यवस्थापन आणि प्रीती झिंटा संतापले आहेत.

सलग चार पराभवांनंतर, सलामीवीर प्रभसिमरन सिंगचे वजन १० किलोने वाढल्याच्या वृत्ताचे प्रीती झिंटा आणि पंजाब किंग्सच्या व्यवस्थापनाने स्पष्टपणे खंडन केले आहे. त्यांनी याला केवळ संघाच्या ब्रँडिंगला नुकसान पोहोचवण्यासाठी पसरवलेले खोटे म्हटले आहे.





पंजाब किंग्सच्या सलग चार पराभवांनंतर, संघात मोठ्या प्रमाणावर बेशिस्त असल्याचे सांगणारा एक अहवाल समोर आला. त्यात म्हटलं होतं की, गेल्या आठवड्यात प्रभसिमरन सिंगचे वजन १० किलोने वाढले होते. खेळाडूही निवांत होते, पहाटेपर्यंत गेम्स खेळून नंतर सराव सत्र चुकवत होते. खेळाडूंची विमाने चुकत होती आणि ते सामने हरत आहेत. त्यामुळे त्यांचा फॉर्म खराब असणे यात आश्चर्य नाही. प्रीती झिंटा आणि पंजाब किंग्स व्यवस्थापनाने आता अशा वृत्तांवर प्रतिक्रिया दिली आहे. आपल्या निवेदनात त्यांनी ही वृत्त पूर्णपणे मूर्खपणाची आणि खोटी असल्याचं म्हटलं आहे. प्रीती झिंटा म्हणाली की, "टीका आणि हेतुपुरस्सर चुकीची माहिती पसरवणं यात फरक आहे. खेळाबद्दलची चर्चा स्वागतार्ह आहे, परंतु एखाद्या संघाला किंवा ब्रँडला हानी पोहोचवण्याच्या उद्देशाने हेतुपुरस्सर खोटी माहिती पसरवणे खपवून घेतले जाणार नाही. झिंटाने सांगितलं की, विश्वसनीय स्रोत आणि माध्यम व्यावसायिकांसह सर्वांनी अशी चुकीची माहिती पसरवण्यापूर्वी जबाबदारी घ्यावी, असे आवाहन ती करते."

पंजाब किंग्सने म्हटलं आहे की, "क्षुल्लक प्रसिद्धी मिळवण्यासाठी खोट्या बातम्या आणि बनावट गोष्टी पसरवणं हा खेळाचा भाग नाही. चुकीची माहिती पसरवण्यापूर्वी सर्वांनी तथ्यांची पडताळणी करावी, असे आम्ही आवाहन करतो." कर्णधार श्रेयस अय्यरच्या नेतृत्त्वाखालील पंजाब किंग्सने आयपीएल २०२६ मध्ये आतापर्यंत ११ सामने खेळले असून, त्यापैकी सहा सामने जिंकले आहेत आणि चार गमावले आहेत. एका सामन्यात त्यांना गुण विभागून घ्यावे लागले. या ११ सामन्यांनंतर, त्यांचे १३ गुण झाले आहेत आणि ते गुणतालिकेत चौथ्या स्थानावर असून, प्लेऑफसाठीच्या शर्यतीत आहेत.

## हैदराबाद फक्त ८६ धावांवर ऑलआऊट! गुजरातचा विजय

■ मुंबई /वृत्तसंस्था

गुजरात टायटन्सने सनरायझर्स हैदराबादच्या फलंदाजी फळीला सुरूंग लावत दणदणीत विजयाची नोंद केली आहे. गुजरातने हैदराबादचा धावांनी पराभव करत गुणतालिकेत पहिलं स्थान गाठलं आहे. यासह गुजरात टायटन्स संघाचे सर्वाधिक १६ गुण झाले आहेत, यासह त्यांचं प्लेऑफमधील स्थान जवळपास निश्चित झालं आहे. गुजरातच्या गोलंदाजीसमोर हैदराबादचा संघ फक्त ८७ धावांवर सर्वबाद झाला.

गुजरात टायटन्सने प्रथम फलंदाजी करत साई सुदर्शन व वॉशिंग्टन सुंदर यांच्या अर्धशतकांच्या बळावर १६८ धावांचं आव्हान दिल. तर प्रत्युत्तरात हैदराबादचा कोणताच संघ २० धावांचा आकडाही पार करू शकला नाही, परिणामी संघ अवघ्या ८७ धावांवर सर्वबाद झाला. यामध्ये गुजरातच्या गोलंदाजांचं मोठं योगदान होतं. गुजरात टायटन्सनने दिलेल्या १६९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पहिल्याच षटकात ट्रॅव्हिस हेड शून्यावर बाद झाला. तर कगिसो रबाडाच्या गोलंदाजीवर अभिषेक शर्मा, इशान किशन व स्मरण रविचंद्रन हे फलंदाज बाद झाले. त्यानंतर जेसन होल्डर व प्रसिध कृष्णा यांनी हैदराबादच्या उर्वरित संघाला माघारी धाडलं. कर्णधार पॅट कमिन्सने सर्वाधिक १९ धावांची खेळी केली. पण कोणताच फलंदाज २० धावांचा पल्ला पार करू शकला नाही. गुजरातकडून कगिसो रबाडा व जेसन होल्डर यांनी सर्वाधिक ३-३ विकेट्स घेतल्या. तर प्रसिध कृष्णाने २ व सिराज-रशीदने १-१ विकेट्स घेतल्या. हैदराबादने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. शुबमन गिल व जोस बटलरला अनुक्रमे ५ व ७ धावांवर प्रफुल्ल हिंगेने माघारी धाडलं. पण साई सुदर्शनने संघासाठी महत्त्वपूर्ण अर्धशतकी खेळी केली.

साई सुदर्शन ४४ चेंडूत ५ चौकार व २ षटकारांसह ६१ धावा करत बाद झाला. तर निशांत सिंधूने १४ चेंडूत २२ धावांची झटपट खेळी केली. त्यानंतर वॉशिंग्टन सुंदरने ३३ चेंडूत ७ चौकार व एका षटकारासह ५० धावांची खेळी करत अर्धशतक झळकावलं.

## "मॅडम मोठा गोंधळ घालून गेल्यात...", बृजभूषण सिंह यांचं विनेश फोगाटबाबत मोठं वक्तव्य; म्हणाले, "खेळाडूला विनाकारण..."

■ जयपूर/वृत्तसंस्था

भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांनी मंगळवारी कुस्तीपटू विनेश फोगाटच्या विधानांवर प्रतिक्रिया दिली. विनेशने सोमवारी आरोप केला होता की भारतीय कुस्ती महासंघाकडून तिला महिला फ्रीस्टाईल प्रकारात स्पर्धा खेळण्याची परवानगी देण्यात आली नाही. २०२३ मध्ये विनेशसह सहा महिला कुस्तीपटूंनी बृजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक छळाचे आरोप केले होते. मात्र, या संपूर्ण वादावर प्रतिक्रिया देताना बृजभूषण म्हणाले की, "सोमवारी विनेशने मांडलेला विषय आता माझ्याशी संबंधित नाही."





"मॅडमने जो गोंधळ घालून गेल्या आहेत, तो सध्या मी साफ करत आहे. तसेच, कुस्तीची स्पर्धा कुठे होणार किंवा होणार नाही, हा विषय आता माझ्या अधिकारक्षेत्रात येत नाही. हा निर्णय पूर्णपणे सध्याच्या भारतीय कुस्ती महासंघाचा आहे. स्पर्धा कुठे आयोजित करायची, कोण खेळणार आणि कोण नाही, हे ठरवण्याचा अधिकार त्यांच्याकडे आहे," असं बृजभूषण शरण सिंह यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं. पुढे म्हणाले, "मी अनेक वर्षे महासंघाचा अध्यक्ष होतो. त्या अनुभवावरून एवढंच सांगू शकतो की महासंघ कधीही कोणत्याही खेळाडूला विनाकारण खेळण्यापासून रोखत नाही, कारण महासंघ हा खेळाडूंसाठीच असतो. जर एखाद्या खेळाडूला थांबवण्यात आलं असेल, तर त्यामागे काही कारण नक्कीच असेल आणि ते कारण संबंधित खेळाडूला सांगितलंही गेलं असेल."

दरम्यान, भारतीय कुस्ती महासंघाने विनेश फोगाटला डोपिंगविरोधी नियमांचं उल्लंघन आणि शिस्तभंगाचे आरोप करत कारणे दाखवा नोटीस बजावली होती. तसेच तिला २६ जूनपर्यंत स्पर्धांमधून बंदी घालण्यात आली आहे. या नोटिसनंतर अवघ्या दोन दिवसांनी विनेश गोंडा येथे आयोजित राष्ट्रीय ओपन रँकिंग स्पर्धेसाठी पोहोचली. विशेष म्हणजे, एप्रिलच्या अखेरीसच तिने या स्पर्धेसाठी नोंदणी केली होती. पॅरिस ऑलिम्पिकमधील निराशेनंतर तब्बल दोन वर्षांनी पुनरागमन करण्याच्या तयारीत असलेल्या विनेश फोगाटला भारतीय कुस्ती महासंघाकडून सविस्तर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. महासंघाने तिच्यावर शिस्तभंग आणि डोपिंगविरोधी नियमांचे उल्लंघन केल्याचे आरोप केले असून, २६ जूनपर्यंत देशांतर्गत स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास अपात्र ठरवलं आहे. महिला फ्रीस्टाईल प्रकारासाठी पडताळणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विनेश गोंडा येथे पोहोचली होती. मात्र, महासंघाने तिला आधी शनिवारी पाठवलेल्या नोटिसला सविस्तर उत्तर देण्यास सांगितलं. भारतीय कुस्ती महासंघाच्या मते, निवृत्तीनंतर पुनरागमन करणाऱ्या खेळाडूंना यूडब्ल्यूडब्ल्यूच्या डोपिंगविरोधी नियमांनुसार अनिवार्य सहा महिन्यांची नोटीस कालावधी पूर्ण करावा लागतो.

## मुंबई इंडियन्सने हार्दिक पंड्याला कर्णधारपदावरून काढून टाकलं?

■ मुंबई)/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ मधून मुंबई इंडियन्सचा संघ बाहेर पडला आहे. मुंबई इंडियन्सला आरसीबीविरूद्ध सामन्यात पराभवाचा धक्का बसला आणि त्यामुळे संघ स्पर्धेबाहेर झाला. संघाचा कर्णधार हार्दिक पंड्या पाठीच्या दुखापतीमुळे गेले काही सामने खेळलेला नाही. पण या दुखापतीदरम्यान तो संघाच्या डगआऊटमध्येही दिसून आला नाही. त्यामुळे विविध चर्चांना उधाण आलं आहे. याचदरम्यान आता हार्दिक पंड्याच्या गर्लफ्रेंडने टाकलेल्या इन्स्टा स्टोरीने सर्वांचं लक्ष वेधलं आहे.




हार्दिक पंड्या आणि मुंबई इंडियन्स यांच्या बिनसलं असल्याच्या चर्चांना सोशल मीडियावर पुन्हा नव्याने उधाण आलं आहे. हार्दिकची गर्लफ्रेंड माहिका शर्माने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केल्यानंतर या चर्चांना आणखी हवा मिळाली. या पोस्टनंतर अशी चर्चा सुरू झाली आहे की, १४ मे रोजी पंजाब किंग्जविरुद्ध धर्मशालामध्ये होणाऱ्या आयपीएल २०२६ सामन्यापूर्वी हार्दिक पंड्या मुंबई इंडियन्सच्या संघासोबत गेला नाही.

माहिका शर्माच्या इन्स्टाग्राम स्टोरीचे स्क्रीनशॉट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. अनेक चाहत्यांनी दावा केला की हार्दिक सध्या घरी आराम करत आहे आणि संघासोबत धर्मशाला येथे पोहोचलेला नाही. माहिकाने शेअर केलेल्या स्टोरीमध्ये हार्दिक पंड्या घरात उभा असून त्याच्या हातात मोठा फुलांचा गुच्छ दिसत असल्याचं चाहत्यांनी लक्षात आणून दिलं. माहिकाने शेअर केलेल्या या फोटमध्ये हार्दिकचा चेहरा दिसत नसला तरी तो फुलांचा गुच्छ घेतलेला व्यक्ती हार्दिकच असल्याचा दावा केला आहे. सध्या मुंबई इंडियन्सचा संघ धरमशालासाठी निघाला असताना हार्दिक पंड्या त्याच्या घरी आराम करत असल्याच्या चर्चा वेगाने पसरू लागल्या आहेत. बीसीसीआयने खेळाडूंना गर्लफ्रेंडसोबत प्रवास करण्यावर निर्बंध घातल्यानंतर मुंबई इंडियन्स आणि हार्दिक पंड्या यांच्यात मतभेद असल्याच्या अफवाही सोशल मीडियावर फिरत आहेत. मात्र, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

सोशल मीडियावर अनेक पोस्ट्समध्ये हार्दिक पंड्या पंजाब किंग्जविरुद्धचा सामना खेळणार नसल्याचे दावे केले जात आहेत. काही पोस्ट्समध्ये तर मुंबई इंडियन्सने हार्दिकला कर्णधारपदावरून हटवलं असून दुखापतीचं कारण केवळ त्याची प्रतिमा वाचवण्यासाठी पुढे केलं जात असल्याचंही म्हटलं जात आहे. याआधीही रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुविरुद्धच्या रायपूरमधील सामन्यासाठी हार्दिक पंड्या सुरुवातीला संघासोबत गेला नव्हता. मात्र, नंतर तो त्याच्या गर्लफ्रेंड माहिका शर्मासोबत रायपूरला पोहोचला होता. त्यामुळे यावेळीही तो नंतर धरमशालामध्ये संघात सामील होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या हार्दिक पंड्याच्या उपलब्धतेबाबत किंवा तो संघासोबत नसल्याबाबत मुंबई इंडियन्स किंवा स्वतः हार्दिककडून कोणतंही अधिकृत वक्तव्य करण्यात आलेलं नाही. मुंबई इंडियन्सचा पंजाब किंग्जविरुद्धचा सामना १४ मे रोजी धरमशालामध्ये होणार असून, हार्दिक उद्या किंवा थेट सामन्याच्या दिवशीही संघात सामील होऊ शकतो.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






# चाळीतलं घर ते 2BHK घराची स्वप्नपूर्ती!

## नव्या घराविषयी बोलताना भारावली प्रियांका तेंडोलकर

**मुंबई :** अभिनेत्री प्रियांका तेंडोलकर मराठी टेलिव्हिजन विश्वातील एक लोकप्रिय अभिनेत्री आहे. सध्या 'ठरलं तर मग' मालिकेतील तिच्या प्रिया या भूमिकेने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केले आहे. प्रिया जरी नायिकेच्या नाकीनऊ आणणारी खलनायिका असली तरीही प्रेक्षक तिचं काम एन्जॉय करतात. या प्रियाने वैयक्तिक आयुष्यात नुकताच एक मोठा टप्पा पार केला आणि तो म्हणजे स्वत:च्या घराची स्वप्नपूर्ती! प्रियांकाने तिच्या आई-बाबांसह मिळून २इकघ घर खरेदी केले. अलिकडेच या नव्या घराविषयी बोलताना ती खूपच भारावली होती.

प्रियांका तेंडोलकर म्हणाली, 'ते घर आई-बाबांचं आणि माझं आहे. आम्ही तिघांनी मिळून हे घर घेतलं, ज्यामध्ये तिघांनीही बरोबरीने पैसा गुंतवला आहे. हा संसार कायम तिघांचा होता आणि तिघांचाच असणार आहे. तिघांच्या संसारातील हे छोटसं बाळ आहे, असं आपण म्हणूया. माझा जन्म चाळीत झालाय, त्यानंतर मग आम्ही १ठघ मध्ये राहत होतो, त्यानंतर १इकघ मध्येही राहिलो. मात्र, माझ्या आई-



बाबांचं स्वप्न होतं की 2BHK घर घ्यायला हवा. महाराजांच्या आणि स्वामींच्या कृपेने नवीन घर घेणं शक्य झालं. ते त्यांचच घर आहे, आम्ही त्यात राहतो.' एका मुलाखतीत प्रियांका बोलत होती.

दरम्यान प्रियाने असेही सांगितले की, तिच्या आईचा आणि तिचा इंटिरिअर डिझाइनचा व्यवसाय आहे. त्यामुळे नवीन घर कसं सजवायचं आणि कुठे काय ठेवायचं, हे स्वप्न त्यांनी आधीच पाहिलं होतं. इंटिरिअर करताना ती सगळी स्वप्न पूर्ण केल्याचं प्रियांकाने सांगितलं. प्रियांका म्हणाली की, 'आम्हाला जितकं झेपेल, परवडेल आणि जे आमच्या सोयीचं असेल असं आमचं ते घर आहे.' प्रियांकाने असेही म्हटले की, त्यांचं घर मोठं होत असताना त्यांनी घरातील देव्हाराही पूर्वीच्या घरापेक्षा मोठा केला आहे. तसेच गेली अनेक वर्ष प्रियाच्या घरी शेगांवच्या गजानन महाराजांची पालखी येते, यंदा नवव्या वर्षी नव्या घरात ही पालखी आली. काही दिवसांपूर्वी अभिनेत्रीने या पालखीनिमित्ताने शेअर केलेल्या काही फोटोंमध्येही तिच्या या नव्या घराची आणि खास बनवून घेतलेल्या देव्हाऱ्याची झलक पाहायला मिळाली.

# कॅन्सरशी झुंज देणाऱ्या दीपिका कक्करने सांगितली भयंकर परिस्थिती

**मुंबई :** अभिनेत्री दीपिका कक्कर सध्या कॅन्सरची ट्रीटमेंट घेते आहे. यासंबंधी आणि तिच्या दैनंदिन आयुष्यातील अनेक गोष्टी या व्लॉगवर ती शेयरही करत असते. नुकताच तिने दिवाळी सेलिब्रेशनचा व्लॉग शेयर केला. यादरम्यान तिने सेलिब्रेशनसहित सध्या तिच्या ट्रीटमेंटबाबतची अपडेटही चाहत्यांना दिली.

यामध्ये दीपिका सांगते की काही केसेसमध्ये लिव्हर कॅन्सरसाठी टार्गेट थेरेपी घेतल्यानंतर अनेकांचे केस जातात. यामध्ये तिलाही ट्रीटमेंटच्या गंभीर दुष्परिणामांचा सामना करावा लागतो आहे. यामुळे तिचे केस गळत आहेत. तिने या त्रासापासून सुटका करून घेण्यासाठी हेअर पॅच वापरण्याचा निर्णय घेतल्याचेही सांगितले.दीपिका पुढे म्हणते माझ्या डॉक्टरने मला



सांगितले की टार्गेटेड थेरपीमध्ये फार कमी लोकांचे केस गळतात. पण माझ्या केसांकडे तुम्ही नीट पाहिले तर लक्षात येईल की माझे किती केस गळत आहेत. मी आता हेअर पॅच मागवले आहेत. या सगळ्यात मला थायरॉईडचा त्रास होतो आहे. त्यात मला हार्मोनल असंतुलनाचा त्रास होतो आहे. मी तुम्हाला परत परत सांगू इच्छिते की आरोग्य ही सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे. करियरवर लक्ष देणे गरजेचे आहेच. पण त्या ही पेक्षा महत्वाचे आहे आरोग्याची काळजी घेणे आणि आपल्या जीवलगांसोबत वेळ घालवा. मला जवळपास अडीच वर्षे ही औषधे घ्यायची आहेत. मला याबाबत काहीच अडचण नाही. मी यातून बरी होईन याची मला खात्री आहे.



# आम्ही वेगळे झालो, खूप वाईट टप्पा.. भीती वाटत होती

## 'नवरी मिळे हिटलरला' फेम अभिनेत्रीचं मोडलं लग्न; कठीण काळाविषयी म्हणाली..

**मुंबई :** अभिनेत्री भूमिजा पाटील मराठी मनोरंजन विश्वातील एक लोकप्रिय चेहरा आहे. ती 'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेतून घराघरात पोहोचली. शिवाय सोशल मीडियावरही भूमिजाचा मोठा चाहतावर्ग आहे. परिणामी भूमिजाचं वैयक्तिक आयुष्याचीही चर्चा होते. अलिकडेच तिने तिच्या खासगी जीवनाबद्दल भाष्य करताना तिचं लग्न म ोडल्याविषयी भाष्य केले.

जानेवारी २०२३ मध्ये तिचा साखरपुडा झालेला, अभिनेत्रीने या क्षणाचे काही खास फोटोही सोशल मीडियावर शेअर केलेले. तिने नुकतीच एक मुलाखत दिली, ज्यात तिने सांगितले की, ती आणि तिचा जोडीदार वेगळे झाले आहेत. आयुष्याच्या कोणत्याही वळणावर बहिणीची सोबत आहे याविषयी बोलताना तिने असे म्हटले की, 'सगळ्यांनाच माहितीये की माझा साखरपुडा झालेला आहे आणि लग्न होणार होतं. बऱ्याच लोकांना असंही वाटतं की, माझं लग्न झालंय. दुर्दैवाने ते आता नाही आहे. मी याआधी अनेक मुलाखतींमध्ये बोलले आहे की, लग्नासाठी मी किती उत्सुक आहे किंवा मला लग्न करायचं आहे. काही कारणास्तव आम्ही आता वेगळे झालो आहोत.' एका मुलाखतीत भूमिजा बोलत होती. भाऊबीजेनिमित्ताने भूमिजा आणि तिची बहीण प्रणाली या मुलाखतीत सहभागी झाल्या होत्या.

भूमिजा पुढे म्हणाली, 'हा माझ्या आयुष्यातला खूप महत्त्वाचा निर्णय होता, ज्याची मला खूप जास्त भीती वाटत होती. लोक काय म्हणतील, आता काय होईल याचा विचार येत होता. पण त्या सगळ्या परिस्थिती, जिथे मी म्हटलेलं की मला त्रास होतोय किंवा मी काहीतरी चुकीचा निर्णय घेतलाय... तेव्हा मी हे फक्त माझ्या ताईजवळ आणि मम्म ीपप्पांशी बोलले. दोन्ही बहिणींसोबत मी सर्वात आधी बोलले. त्यावेळी लोक काय म्हणतील हा मुद्दाच आला नाही, त्या दोघींचं म्हणणं होतं की, तू ठाम आहेस का, यामुळे त्रास नाही ना होणार? तर आम्ही तुझ्यासोबत आहोत. जर तुला त्रास होणार असेल तर तो आम्हाला बघवणार नाही, त्या म्हणाल्या की, त्यामुळे तू घे निर्णय. माझ्या आयुष्यातला हा खूप मोठा निर्णय होता, या सगळ्या प्रक्रियेत त्या माझ्यासोबत होत्या. आयुष्यातील खूप वाईट टप्पा होता तो.'

भूमिजाने असे म्हटले की, तिच्या बहिणींसोबतच्या संभाषणात ती चुकीची किंवा बरोबर असा मुद्दाच आला नाही. 'तुझा आनंद हा आमचा आनंद' असे तिच्या बहिणींनी म्हटल्याचे ती म्हणाली.

# ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला सुरूवात

**जनसंचलन/बुलढाणा**
भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारीत होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. या हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देता यावे, या दृष्टीने केंद्र शासनाने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे. भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधीत संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू कोणाला स्वखुशीने ही हस्तलिखिते राज्य शासनाकडे सुपूर्द करावयाची झाल्यास शासन ती स्वीकारेल. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

# जिल्ह्यातील नागरिकांनी स्व-गणना करावी जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांचे आवाहन

**जनसंचलन बुलढाणा**
जिल्ह्यामध्ये १ मेपासून स्व-जनगणनेच्या मोहिमेला सुरुवात झाली आहे. यावेळची जनगणना पूर्णपणे डिजिटल माध्यमाद्वारे होणार असून, नागरिकांना स्वतः ची माहिती स्वतः भरण्याची म्हणजेच स्व-गणना करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे. यावेळच्या जनगणनेमध्ये १५ मेपर्यंत नागरिक स्वतःची नोंदणी करू शकतील. नागरिकांनी ... या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपला मोबाईल क्रमांक नोंदवून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी. यात साधारणपणे ३० प्रश्न विचारले जातील, ज्यांची उत्तरे देऊन नागरिक स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची माहिती भरू शकतील. ही माहिती भरल्यानंतर एक - (- ) जनरेट होईल, जो नागरिकांना जपून ठेवावा लागेल. हा आयडी प्रत्यक्ष जनगणना करण्यासाठी आलेल्या प्रगणकाला द्यावा लागणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः स्व-गणना केली आहे. या प्रक्रियेसाठी केवळ दोन मिनिटांचा वेळ लागला आहे. नागरिकांनाही वेळ काढून या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे. दि. १५ मेनंतर, म्हणजेच दि. १६ मेपासून प्रशासनातर्फे नियुक्त केलेले प्रगणक घरोघरी येऊन नागरिकांनी भरलेल्या माहितीची पडताळणी करणार आहेत. डिजिटल जनगणनेच्या या सुविधेमुळे नागरिकांचा वेळ वाचणार असून ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुटसुटीत होणार आहे.



पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001


# चिखली येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर

**जनसंचलन बुलढाणा**
चिखली तालुक्यातील नागरी क्षेत्रासाठी आयोजित करण्यात आलेल्या ङ्गछत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरफ अभियानास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महसूल विभाग चिखली व नगर परिषद चिखली यांच्या संयुक्त विद्यमाने संत सावता माळी भवन, चिखली येथे हे शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या शिबिरात ग्रामस्थ व शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष पंडितराव देशमुख हे होते, तर उद्घाटक म्हणून अंकुशराव पाटील उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये उपनगराध्यक्ष वैशालीताई खेडेकर, तहसीलदार विजय सवडे, मुख्याधिकारी प्रशांत बिडगर, तालुका कृषी अधिकारी अशोक सुरडकर, भूमी अभिलेख विभागाचे श्री. रेड्डी, मंडळ अधिकारी भगवान पवार तसेच नगर परिषद चिखलीचे सभापती व नगरसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व राज्यगीताने करण्यात आली. तहसीलदार विजय सवडे यांनी प्रस्तावनेत नवीन अकृषक नियम, शासकीय जागेवरील अतिक्रमण नियमितीकरण, शासन निर्णय दि. २५ मार्च २०२६, पाणंद रस्ते व तुकडेबंदी कायद्याबाबत सविस्तर माहिती दिली.मार्गदर्शन करताना अंकुशराव पाटील यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात नगराध्यक्ष पंडितराव देशमुख यांनी ङ्गङ्घशासन आपल्या दारीफ्फ उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महसूल विभागाशी संबंधित जिवंत सातबारा, फेरफार, ८-अ उतारे, विविध दाखले, रमाई आवास योजनेचे धनादेश, जन्म-मृत्यू दाखले व मालमत्ता पत्रकांचे वाटप करण्यात आले. तसेच मातोश्री शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत ३२ रस्त्यांच्या २ किलोमीटर अंतराच्या कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले. शिबिरामध्ये रमाई आवास योजनेअंतर्गत १५ धनादेश वितरित करण्यात आले. नगर परिषद मालमत्ता पत्रक २२, जिवंत सातबारा ४३, फेरफार व ८-अ चे २१० उतारे, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेंतर्गत ६० लाभार्थ्यांची प्रकरणे मंजूर करण्यात आली. तसेच ११० नागरिकांना उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. ५२ लाभार्थ्यांचे डिजिटल लाईफ सर्टिफिकेट तयार करण्यात आले. अनेक नागरिकांच्या प्रलंबित अडचणींचे तत्काळ निवारण झाल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्राम महसूल अधिकारी प्रभाकर गवळी यांनी, तर आभार प्रदर्शन मुख्याधिकारी प्रशांत बिडगर यांनी मानले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महसूल विभाग व नगर परिषद चिखलीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण शिबिर शिस्तबद्ध व यशस्वी वातावरणात पार पडले.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा
बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे




ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# जिल्ह्यातील नागरिकांनी स्व-गणना करावी; जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यामध्ये १ मेपासून स्व-जनगणनेच्या मोहिमेला सुरुवात झाली आहे. यावेळची जनगणना पूर्णपणे डिजिटल माध्यमाद्वारे होणार असून, नागरिकांना स्वतःची माहिती स्वतः भरण्याची म्हणजेच स्व-गणना करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे. यावेळच्या जनगणनेमध्ये १५ मेपर्यंत नागरिक स्वतःची नोंदणी करू शकतील. नागरिकांनी ... या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपला मोबाईल क्रमांक नोंदवून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी. यात साधारणपणे ३० प्रश्न विचारले जातील, ज्यांची उत्तरे देऊन नागरिक स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची माहिती भरू शकतील. ही माहिती भरल्यानंतर एक



डॉ. प्रविणकुमार देवरे
जिल्हाधिकारी, बुलढाणा

जनरेट होईल, जो नागरिकांना जपून ठेवावा लागेल. हा आयडी प्रत्यक्ष जनगणना करण्यासाठी आलेल्या प्रगणकाला द्यावा लागणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः स्व-गणना केली आहे. या प्रक्रियेसाठी केवळ दोन मिनिटांचा वेळ लागला आहे. नागरिकांनाही वेळ काढून या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे. दि. १५ मेनंतर, म्हणजेच दि. १६ मेपासून प्रशासनातर्फे नियुक्त केलेले प्रगणक घरोघरी येऊन नागरिकांनी भरलेल्या माहितीची पडताळणी करणार आहेत. डिजिटल जनगणनेच्या या सुविधेमुळे नागरिकांचा वेळ वाचणार असून ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुटसुटीत होणार आहे.

# बुलढाण्यात थॅलेसेमिया संकल्प सप्ताहानिमित्त जनजागृती रॅली उत्साहात संपन्न

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा आरोग्य विभाग आणि जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात थॅलेसेमिया संकल्प सप्ताहानिमित्त भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. थॅलेसेमिया आणि हिमोग्लोबिनोपॅथी यांसारख्या अनुवांशिक रक्तविकारांबाबत समाजात जनजागृती निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिचारिका प्रशिक्षण केंद्र व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या वतीने या रॅलीचे नियोजन करण्यात आले. रॅलीमध्ये विविध घोषणांच्या माध्यमातून नागरिकांना आजाराचे स्वरूप, प्रतिबंधात्मक उपाय आणि वेळेवर तपासणीचे महत्त्व पटवून देण्यात आले. विशेषतः विवाहपूर्व आणि गर्भधारणापूर्व तपासणी करणे थॅलेसेमिया रोखण्यासाठी किती आवश्यक आहे, याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. या संकल्पनेंतर्गत जिल्ह्यातील विविध आरोग्य संस्थांमार्फत उपक्रम राबवले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून ५ मे रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, हातेडी बु. येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सिकलसेल आणि थॅलेसेमिया रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि रक्तदानाबाबत समाजात सकारात्मकता वाढावी, हा या मोहिमेचा मुख्य हेतू आहे. थॅलेसेमिया हा अनुवांशिक आजार असल्याने रुग्णांना नियमित रक्ताची गरज भासते, त्यामुळे रक्तदान हे श्रेष्ठ सामाजिक कर्तव्य असल्याचे मान्यवरांनी यावेळी नमूद केले. या कार्यक्रमास अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, डॉ. मयुरी टेकाळे, डॉ. विश्वास खर्चे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी डॉ. महेश गोरे, डॉ. आशिष गायकवाड, अध्यापिका शेळके, अर्चना आराख, ज्ञानेश्वर गाडेकर, अमोल गिरी, गणेश गायकवाड यांच्यासह परिचारिका प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी आणि आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. थॅलेसेमिया नियंत्रणासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे.

# बी.बी.एफ.पेरणी यंत्रासाठी महाडीबीटीवर अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

जनसंचलन बुलढाणा

कृषी यांत्रिकीकरण (राज्य पुरस्कृत यांत्रिकीकरण, यांत्रिकीकरण उपअभियान व राष्ट्रीय कृषी विकास यांत्रिकीकरण) योजनेअंतर्गत सन २०२६-२७ मध्ये बी.बी.एफ. पेरणी यंत्रासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी प्रणालीवर अर्ज करून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी एस. जी. डाबरे यांनी केले आहे. अल-निनोच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगाम २०२६ मध्ये सोयाबीन, तूर, मूग व उडीद पिकांच्या पेरणीत सुलभता आणणे, बियाण्याची बचत करणे तसेच उत्पादन वाढविणे या उद्देशाने बी.बी.एफ. पेरणी यंत्राचा कृषी यांत्रिकीकरण अभियानांतर्गत समावेश करण्यात आला आहे.या योजनेंतर्गत वैयक्तिक शेतकरी तसेच शेतकरी गट अनुदानासाठी पात्र राहणार आहेत. ट्रॅक्टर ३५ बीएचपी व त्यावरील क्षमतेसाठी बी.बी.एफ. पेरणी यंत्र खरेदीवर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्रति यंत्र ५५ हजार रुपये किंवा यंत्राच्या किमतीच्या ५० टक्के, यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान मिळणार आहे. तर सर्वसाधारण व मोठ्या शेतकऱ्यांना प्रति यंत्र ४४ हजार रुपये किंवा यंत्राच्या किमतीच्या ४० टक्के, यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेची अंमलबजावणी कृषि यांत्रिकीकरण उपअभियान () मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात येणार आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी ://.. या संकेतस्थळावर जाऊन महाडीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी कृषि विभागाचे सहायक कृषि अधिकारी, उप कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी किंवा तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असेही कृषी विभागाकडून कळविण्यात आले आहे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित मॉडेल डिग्री कॉलेजच्या नूतन इमारतीचा १४ मे रोजी भूमिपूजन

जनसंचलन/बुलढाणा

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित मॉडेल डिग्री कॉलेज, बिरसिंगपूर, बुलढाणा येथील नूतन इमारतीचा भूमिपूजन सोहळा दि. १४ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आयुष (स्वतंत्र प्रभार), आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांचे शुभहस्ते मॉडेल डिग्री कॉलेज परिसर, अजिंठा रोड, ग्राम-बिरसिंगपूर, बुलढाणा येथे संपन्न होणार आहे.भूमिपूजन सोहळ्याचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाणा जिल्हाचे पालकमंत्री मकरंद जाधव (पाटील), वस्त्रोद्योग मंत्री तथा बुलढाणा जिल्हाचे सहपालकमंत्री संजय सावकारे व महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्हाचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर तसेच आमदार किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, धीरज लिंगाडे, चैनसुख संचेती, डॉ. संजय कुटे, संजय गायकवाड, श्वेता महाले, सिद्धार्थ खरात, मनोज कायंदे, नगरपरिषद अध्यक्ष पूजा संजय गायकवाड, बिरसिंगपूर सरपंच वैशाली संजय शिंदे व विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

# चंद्रपूरच्या उज्वला सोयम यांचा राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्काराने सन्मान

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्राच्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागात आरोग्यसेवेची मशाल तेवत ठेवणाऱ्या उज्वला महादेव सोयम यांचा नवी दिल्ली येथे गौरव करण्यात आला. आंतरराष्ट्रीय परिचारिका दिवस २०२६ निमित्त राष्ट्रपती भवनात आयोजित सोहळ्यात, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उज्वला सोयम यांना त्यांच्या अतुलनीय कार्याबद्दल प्रतिष्ठित राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या विशेष सोहळ्यात देशभरातून निवडक एकूण १५ नर्सिंग अधिकारी कर्मचारी यांचा त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी सन्मान करण्यात आला. या सोहळ्यात केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि आरोग्य सचिव पुण्य सलीला श्रीवास्तव उपस्थित होत्या. विदर्भातील चंद्रपूर येथील शासकीय सामान्य रुग्णालयात कार्यरत असलेल्या उज्वला सोयम यांनी गेल्या २४ वर्षांपासून आरोग्य क्षेत्रात अत्यंत समर्पित सेवा दिली आहे. विशेषतः नक्षल प्रभावित आणि आदिवासी भागामध्ये कन्याभ्रूण हत्या रोखण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान आणि आरोग्य जनजागृतीमध्ये घेतलेला पुढाकार गौरवास्पद आहे. नैसर्गिक आपत्ती प्रवण क्षेत्र असो किंवा कठीण भौगोलिक परिस्थिती, उच्च जोखीम असलेल्या गर्भवती मातांची आणि बालकांची काळजी घेण्यात त्यांनी नेहमीच तत्परता दाखवली आहे. यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय परिचारिका दिवसाची संकल्पना ङ्कङ्कआमच्या परिचारिका, आमचे भविष्य: सक्षम परिचारिका जीव वाचवतातङ्कङ्क अशी ठेवण्यात आली होती. या पुरस्काराचे स्वरूप पदक, प्रमाणपत्र, प्रशस्तीपत्र आणि १ लाख रुपये रोख असे आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८